- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,५८,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,५६,३५० /-
✔ चांदी : २,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१४ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

२५० टक्के टॅरिफची धमकी देऊन भारत-पाकिस्तान युद्ध थांबवले?

अमेरिकेशी व्यापार थांबवण्याचा सुद्धा इशारा दिला, युद्धादरम्यान ११ विमाने पाडण्यात आली : डोनाल्ड ट्रम्प

वृत्तसंस्था, अमेरिका

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा दावा केला की, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध थांबवण्यासाठी त्यांनी दोन्ही देशांवर २५० टक्के शुल्क लावण्याची धमकी दिली होती. त्यांनी सांगितले की, दोन्ही देशांना स्पष्टपणे सांगितले होते की, जर त्यांनी लढाई थांबवली नाही, तर अमेरिका त्यांच्यासोबतचा व्यापार थांबवेल. त्यांच्या मते, या इशाऱ्यानंतर भारत आणि पाकिस्तानने गोळीबार थांबवला. फ्लोरिडामधील एका निवडणूक रॅलीदरम्यान ट्रम्प यांनी सांगितले की, भारत आणि पाकिस्तान दोन्ही अण्वस्त्रधारी देश आहेत. त्यांनी दोन्ही देशांना सांगितले की, जर त्यांनी लढाई सुरूच ठेवली, तर अमेरिका त्यांच्या मालावर मोठे शुल्क लादेल. त्यांनी दावा केला की, त्यांच्या इशाऱ्यामुळे दोन्ही देश संतप्त झाले, परंतु त्यांनी गोळीबार थांबवला आणि युद्ध संपले. ट्रम्प म्हणाले, "युद्धादरम्यान ११ विमाने पाडण्यात आली. मी ते थांबवले आणि असे करणे माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट होती."



भारताने ट्रम्पचे दावे वारंवार फेटाळून लावले

भारताने कोणत्याही त्रयस्थ पक्षाच्या मध्यस्थीला सातत्याने नकार दिला आहे. भारताच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानच्या लष्करी कारवायांच्या महासंचालकांनी (डीजीएमओ) संपर्क साधून कारवाई थांबवण्याची विनंती केल्यानंतर 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान लष्करी कारवाई थांबवण्याचा करार झाला. याशिवाय, भारत-पाकिस्तान लष्करी संघर्षादरम्यान ११ विमाने पाडण्यात आल्याचा ट्रम्प यांचा दावा भारताने सातत्याने फेटाळला आहे. भारताने स्पष्टपणे सांगितले आहे की, दोन्ही देशांमधील शस्त्रसंधीमध्ये कोणत्याही त्रयस्थ पक्षाचा मध्यस्थी नव्हती.

पहलगाम हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून 'ऑपरेशन सिंदूर'

भारताने गेल्या वर्षी ७ मे २०२५ रोजी 'ऑपरेशन सिंदूर' सुरू केले. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई करण्यात आली होती. या कारवाईचा उद्देश पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीर (पीओके) मधील दहशतवाद्यांचे तळ उद्ध्वस्त करणे हा होता, ज्यात पहलगाम हल्ल्याचा कट रचण्यासाठी वापरल्या गेलेल्या तळांचाही समावेश होता. या हल्ल्यांमध्ये भारतीय लष्कराने अनेक प्रमुख दहशतवादी तळांना लक्ष्य केले. त्यानंतर, पाकिस्तानच्या औपचारिक विनंतीनंतर १० मे रोजी लष्करी कारवाई थांबवण्यात आली. भारताच्या म्हणण्यानुसार, ट्रम्प यांच्या सांगण्यावरून नव्हे, तर पाकिस्तानने कारवाई थांबवण्याची विनंती केल्यानंतर शस्त्रसंधीवर सहमती झाली.

थोडक्यात

एसआयआर विरोधात १४५ संघटना एकवटल्या

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

मतदार याद्यांच्या विशेष सखोल फेरतपासणीच्या विरोधात राजधानी दिल्लीत राजकीय आणि सामाजिक आंदोलनाचा मोठा भडका उडाला आहे. देशातील ८८ शहरांमध्ये सुरू असलेल्या देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आज, २३ ऑक्टोबर रोजी पीपल अगेन्स्ट एसआयआर आणि शेतकरी संघटनांतर्फे केंद्रीय निवडणूक आयोगाच्या कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात येत आहे. ज्येष्ठ वकील प्रशांत भूषण, राजकीय विश्लेषक योगेंद्र यादव, परकला प्रभाकर, अभिनेते प्रकाश राज आणि शेतकरी नेते राकेश टिकैत यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघत असल्याने दिल्लीत प्रचंड तणावाचे वातावरण आहे. दुसरीकडे, न्यायालयीन पातळीवरही आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा ठरणार आहे. काँग्रेसच्या जनता पार्टीचे नेते आशुतोष रांका आणि सौरव दास यांची स्पेशल एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट कोर्टात दुपारी ३ वाजता पेशी होणार आहे; तर आयसाच्या राष्ट्रीय अध्यक्षा नेहा बोरा यांच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालय आज संध्याकाळी निकाल देणार आहे.

कनॉट प्लेस परिसरातील ऐतिहासिक गुरुद्वारा बंगला साहिब येथून दुपारी १ वाजता या मोर्चाची सुरुवात झाली आहे, तो थेट पटेल चौक येथील भारतीय निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर धडकणार आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, मतदार यादीतून अनधिकृतपणे वगळण्यात आलेली नावे त्वरित पुन्हा समाविष्ट करावीत आणि आगामी निवडणुका बॅलेट पेपरवर (मतपत्रिका) घ्याव्यात, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या.

नेहा बोराला दिल्ली उच्च न्यायालयाचा झटका

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

दिल्ली उच्च न्यायालयाने 'आयसा'च्या अध्यक्षा नेहा बोरा यांनी दाखल केलेली याचिका फेटाळली आहे. विशेष कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी त्यांना १० हजार रुपयांचा जामीन सादर करण्याचे आणि शांतता राखण्याचे निर्देश देणाऱ्या नोटीसला बोरा यांनी आव्हान दिले होते. या याचिकेला विरोध करताना, दिल्ली पोलिसांनी म्हटले की बोरा यांची याचिका टिकण्याजोगी नाही. त्यांना दंडाधिकाऱ्यांना काही सूचना दिल्या आहेत.



न्यायालयाने आपला निर्णय राखून ठेवला

न्यायालयाने २२ ऑक्टोबर रोजी बोरा यांच्या याचिकेवरील आपला निर्णय राखून ठेवला. सुनावणीदरम्यान, दिल्ली पोलिसांचे प्रतिनिधित्व करणारे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल चेतन शर्मा यांनी बोरा यांची याचिका टिकण्याजोगी नाही असा युक्तिवाद करत याचिकेला विरोध केला. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने टिप्पणी केली की तपास पूर्ण होईपर्यंत एखाद्या व्यक्तीला चांगल्या वर्तणुकीचा जामीन सादर करण्यास सांगणे हे तपास पूर्ण होईपर्यंत त्या व्यक्तीला निलंबित करण्यासारखेच आहे.

नेहा बोरा यांचा युक्तिवाद फेटाळला

नेहा बोरा यांचा हा युक्तिवाद फेटाळला आहे. बीएनएसएसचे कलम १६३ फक्त मंडी हाऊस परिसरात लागू होते, कनॉट प्लेसमध्ये नाही आणि घटनेच्या वेळी ते अंमलात नव्हते. त्यांनी सांगितले की हा युक्तिवाद वस्तुतः चुकीचा होता. कलम १६३ अंमलात होते, पोलीस दल मर्यादित होते आणि नेहा बोरा पोलिसांना चुकवून कनॉट प्लेसच्या दिशेने पुढे गेल्या. न्यायालयाने म्हटले की, याचिकाकर्तीची मुख्य चिंता ही आहे की, तिच्यावर आधीच गैरवर्तनाचा शिक्का मारला गेला आहे आणि आता तिला चांगल्या वर्तनाचे आश्वासन देण्यास सांगितले जात आहे. न्यायालयाने म्हटले की, जेव्हा एखादी व्यक्ती न्यायालयात येऊन भविष्यात योग्य रीतीने वागण्याचे वचन देते, तेव्हा याचा अर्थ असा होतो की ती आतापर्यंत योग्य रीतीने वागलेली नाही.

सुनावणीच्या शेवटी, उच्च न्यायालयाने दिल्ली पोलिसांना विचारले की, कलम १२६ आणि १३० एकत्र असताना कलम १३० अंतर्गत नोटीस किंवा आदेश जारी करणे, हे दंडाधिकाऱ्यांनी आधीच आपला निर्णय घेतला होता, असे दर्शवत नाही का? खटल्यातील सर्व पक्षांनी आपला युक्तिवाद पूर्ण केल्यानंतर, दिल्ली उच्च न्यायालयाने आज आपला निकाल दिला.

नेहा बोरा यांना १७ ऑक्टोबर रोजी बीएनएसएसच्या कलम १२६ अंतर्गत नोटीस बजावण्यात आली होती. या नोटीसमध्ये त्यांना १९ ऑक्टोबर रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी (एसईएम) यांच्यासमोर हजर राहून, "तपासादरम्यान शांतता राखण्यासाठी" १०००० रुपयांचा वैयक्तिक जामीन आणि एक हमीदार का सादर करू नये, याचे कारण स्पष्ट करण्यास सांगितले होते. त्यानंतर नेहा बोरा यांनी दिल्ली उच्च न्यायालयात या नोटीसला आव्हान दिले, ती रद्द करण्याची आणि पोलिसांना त्यांच्याविरुद्ध कोणतीही सक्तीची कारवाई न करण्याचे निर्देश देण्याची मागणी केली.

रामदास कदम क्रॅक जॅक संघटना : जरांगे

वृत्तसंस्था, जालना

मनोज जरांगे पाटील यांनी काल एक क्लिप ऐकवून महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली आहे. एकनाथ शिंदेंनी जरांगेंना देण्यासाठी भाजपकडून ५०० कोटी रुपये घेतल्याचा या क्लिपमध्ये उल्लेख आहे. त्यामुळे खळबळ उडाली आहे. शिंदे गटाने या क्लिपची चौकशी करण्याची मागणी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या क्लिपची चौकशी करणार असल्याचे म्हटले आहे. या सर्व घडामोडी घडत असतानाच शिवसेना नेते रामदास कदम यांनी उपस्थित केलेल्या काही प्रश्नांवरती मनोज जरांगेंनी संताप व्यक्त केला.रामदास कदम क्रॅक जॅक संघटना आहे.

मी भिंती उभी करत नाही, हाच मराठ्यांमध्ये शिंदे विषयी गैरसमज जावा, शिंदे साहेबांना डॅमेज करावा हे स्वतः तो करत आहे. शंभर टक्के त्याला (रामदास कदम) एकनाथ शिंदे यांनी बोलायला सांगितले नाही. राज्यात आमच्या विरोधात आमच्या गाऱ्हाणे बरेच फोटो काढलेले दिसत आहेत. तू फोटोग्राफर होतास का असा सवालही जरांगेंनी कदमांना केला आहे, तर संजय राऊत तरी बरा आहे. हे (रामदास कदम) खूपच वेड आहे. संजय राऊत एकदाच सकाळी बोलतो. संजय राऊत इमानदार आहे, जेल भोगली पण मागे हटला नाही, असेही पुढे मनोज जरांगेंनी म्हटले आहे. शिंदे सेनेचे ज्येष्ठ नेते रामदास कदम यांनी जरांगे यांच्या ऑडिओ क्लीपच्या टायमिंगवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. याबाबत मनोज जरांगे पाटील यांनी रामदास कदम यांच्याविषयी नवा सवाल उपस्थित केला आहे. तर आता पुन्हा एकदा पत्रकार परिषद घेत मनोज जरांगे यांनी रामदास कदमांवर हल्लाबोल केला आहे.



तूच बाटली पिऊन बघ कशाची बाटली आहे तुला कळेलं

मनोज जरांगे पाटील यांच्यावर शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी मोठा आरोप केला होता, मनोज जरांगे पाटील आंदोलनामध्ये झोपण्यासाठी कप सिरप घेतात. झोपण्यासाठी जरांगे पाटील या सिरपचा सेवन करत होते, असं म्हणत रामदास कदम यांनी पत्रकार परिषदेत फोटो दाखवले होते.

खापरखेडा मुख्य बाजारात भीषण अपघात

ट्रकखाली चिरडून पत्नी ठार

कारचा दरवाजा उघडताच दुचाकीची धडक, रस्त्यावर पडलेल्या महिलेचा ट्रकखाली चिरडून मृत्यू, पती जखमी, उपचारादरम्यान महिलेची प्राणज्योत मालवली

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

मुख्य बाजारात गुरुवारी सायंकाळी घडलेल्या भीषण रस्ते अपघातात ४० वर्षीय महिलेचा मृत्यू झाला,तर तिचा पती जखमी झाला,राष्ट्रीय महामार्गालगत उभ्या असलेल्या कारचा दरवाजा अचानक उघडल्याने मागून येणारी दुचाकी त्यावर आदळली,त्यामुळे दुचाकीवरील पती-पत्नी रस्त्यावर पडले,याचवेळी मागून येणाऱ्या ट्रकच्या पुढील चाकाखाली महिला आल्याने ती गंभीर जखमी झाली, नागपूर येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे खापरखेडा मुख्य बाजारात हळहळ व्यक्त होत आहे,शबनम सत्तार छवारे (४०) रा.सोनार गल्ली,प्रभाग क्रमांक २ मुख्य बाजार खापरखेडा असे मृत महिलेचे नाव आहे,त्यांचे पती सत्तार इस्त्राइल छवारे (४३) हेही या अपघातात जखमी झाले आहेत, मिळालेल्या माहितीनुसार, शबनम छवारे या एका सोसायटीतील काम आटोपून पती सत्तार यांच्यासोबत दुचाकीने (एमएच-४०, टी-७५९४) घरी परतत होत्या, दरम्यान,मुख्य बाजारातील चेमरी गेटजवळ राष्ट्रीय महामार्गाच्या कडेला उभ्या असलेल्या कारचा (एमएच-४० सीए-८४१३) चालकाने अचानक दरवाजा उघडला,त्यामुळे मागून येणारी दुचाकी कारच्या दरवाजावर आदळली. या धडकेने दोघेही रस्त्यावर कोसळले, दुचाकीवरील दाम्पत्य रस्त्यावर पडताच मागून येणाऱ्या ट्रकची (एमएच-४० सीडी-४०५०) शबनम यांना धडक बसली, ट्रकच्या पुढील चाकाखाली आल्याने त्या गंभीर जखमी झाल्या, अपघातानंतर घटनास्थळी नागरिकांची गर्दी जमली, स्थानिक नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने नागपूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र,उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली अपघाताची माहिती मिळताच खापरखेडा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.



मोटेगावकर यांच्या फोनमधील सर्व ४५ प्रश्न तंतोतंत जुळले!

नीट पेपरफुटी प्रकरण, मोबाईलमधील प्रश्न आणि मुख्य परीक्षेतील प्रश्न सारखेच

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

नीट पेपरफुटी प्रकरणात दररोज नवनवे खुलासे समोर येत आहेत. लातूर येथील आरसीसी क्लासेसचे संस्थापक प्रा. शिवराज मोटेगावकर यांच्या मोबाईल फोनमध्ये नीट परीक्षेच्या केमिस्ट्री विषयाचे सर्वच्या सर्व ४५ प्रश्न जसेच्या तसे आढळल्याची खळबळजनक माहिती सीबीआयच्या तपासातून उघड झाली आहे. दिल्ली विद्यापीठाच्या तज्ज्ञांच्या अहवालानंतर सीबीआयने दाखल केलेल्या पुरवणी चार्जशीटमध्ये ही माहिती समोर आली. यामुळे मोटेगावकर यांच्या अडचणी वाढणार आहेत.

सीबीआयच्या तपासादरम्यान नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) दिलेल्या माहितीनुसार नीट परीक्षेसाठी प्रत्येकी १८० प्रश्नांचे चार मास्टर सेट तयार केले जातात. यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्राच्या प्रश्नांचा समावेश असतो. या चारपैकी दोन संचांची छपाई करून ते परीक्षा केंद्रांवर वितरीत केले जातात. २०२६ च्या परीक्षेसाठी केलास आणि शिवालिक हे दोन प्रशासकीय कोडनाव असलेले संच वापरण्यात आले होते.

सीबीआयने मोटेगावकर यांच्या फोनमधून जप्त केलेल्या रसायनशास्त्राच्या प्रश्नांची तुलना या मास्टर सेटशी केली असता थक्क करणारी माहिती समोर आली. शिवालिक सेट या संचातील रसायनशास्त्राचे सर्वच्या सर्व ४५ प्रश्न मोटेगावकर यांच्या फोनमध्ये जप्त केलेल्या डाक्यूमेंटमधील प्रश्नांशी तंतोतंत जुळले आणि केलास सेटमधील संचातील ४५ पैकी ४३ प्रश्न लीक झालेल्या दस्तऐवजाशी जुळले. याशिवाय दुसऱ्या मास्टर सेटमधील ४० प्रश्न तर तिसऱ्या सेटमधील १ प्रश्न लीक झालेल्या माहितीशी जुळला असल्याचे समोर आले असल्याचे पुरवणी अहवालात नमूद केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

दिल्लीच्या जलद गती न्यायालयात २८ जुलै रोजी दाखल करण्यात आलेल्या पुरवणी चार्जशीटमध्ये १३ जणांना आरोपी करण्यात आले.



यामध्ये एनटीएच्या बायोलॉजी तज्ज्ञ मनीषा मांढरे, केमिस्ट्री तज्ज्ञ प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी आणि फिजिक्स तज्ज्ञ मनीषा संजय हवालदार यांच्या नावांचा समावेश आहे.

व्हॉट्सॲप, टेलिग्राम, एअरड्रॉपद्वारे गैरप्रकार

तपासादरम्यान परीक्षपूर्वीच व्हॉट्सॲप, टेलिग्राम आणि एअरड्रॉपच्या माध्यमातून ही प्रश्नपत्रिका आणि त्याच्याशी संबंधित साहित्य पसरवण्यात आले होते. सीबीआयने या प्रकरणी साक्षीदारांचे जबाब, हस्तलिखित नोट्स आणि पैशांच्या देवाणघेवाणीचे संदेश तपासून संपूर्ण साखळीचा पदार्फाश केला आहे.

सराव परीक्षेच्या नावाने मुख्य प्रश्नांचा सराव

आरसीसी क्लासेसच्या विद्यार्थ्यांकडून जप्त करण्यात आलेल्या मॉक टेस्टच्या (सराव परीक्षा) प्रश्नपत्रिका दिल्ली विद्यापीठाच्या तज्ज्ञांकडे तपासणीसाठी पाठवण्यात आल्या. १९ एप्रिल रोजी घेतलेल्या मॉक टेस्टमध्ये केलास मास्टर सेटमधील १५ प्रश्न जसेच्या तसे घेण्यात आले होते. ३० एप्रिलच्या मॉक टेस्टमध्ये शिवालिक सेटमधील ६ प्रश्न आणि दुसऱ्या सेटमधील ५ प्रश्न समाविष्ट होते. आरोपी शिक्षक पी. व्ही. कुलकर्णी यांच्या फोनवरून ११ एप्रिल ते २९ एप्रिल दरम्यान जप्त करण्यात आलेल्या १३ प्रश्नांच्या इमेज तज्ज्ञांच्या अहवालानुसार चारही मास्टर सेटशी जुळल्या आहेत.

महावितरणच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत नागपूर परिमंडलाचे 'थलाई कुथल' प्रथम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महावितरणच्या 'नाट्यबहार' या आंतरप्रादेशिक राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेत नागपूर परिमंडलाच्या 'थलाई कुथल' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला, तर कोल्हापूर परिमंडलाच्या 'समोरच्या घरात' या नाटकाला द्वितीय क्रमांक मिळाला आहे. पुण्यातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृह, पद्मावती येथे २१ व २२ ऑक्टोबर रोजी झालेल्या या दोन दिवसीय स्पर्धेचा गुरुवारी सायंकाळी उत्साहात समारोप झाला. विविध सामाजिक विषयांवरील चार नाटकांच्या सादरीकरणातून महावितरणच्या कर्मचाऱ्यांमधील कलागुणांचा आविष्कार अनुभवायला मिळाला.



बक्षीस वितरण समारंभाला महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, कोकण प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे, कार्यकारी संचालक परेश भागवत व अंकुर कावळे, कार्यकारी संचालक तथा पुणे प्रादेशिक संचालक सुनील काकडे आणि नागपूर प्रादेशिक संचालक राजेश नाईक, समन्वयक तथा मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके, प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्यासह परीक्षक म्हणून राज काझी, अजय धनवे, शुभांगी पाठक व राज कुबेर यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना संचालक राजेंद्र पवार म्हणाले, आव्हानात्मक परिस्थितीत दैनंदिन कामांची जबाबदारी सांभाळताना वीज कर्मचाऱ्यांनी आतील कलाकार आणि कला दोन्ही जिवंत ठेवण्याचे काम केले आहे. अगदी व्यावसायिक नाटकांना साजेशी कामगिरी महावितरणचे कलाकार करत आहेत. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप जगदाळे यांनी चारही नाटकांचे सखोल विश्लेषण करून रसिक म्हणून नाट्यरूपी मेजवानीचा आस्वाद घेतल्याचे सांगत सर्व कलाकारांचे कौतुक केले.

प्रभारी मुख्य अभियंता ज्ञानदेव पडळकर यांच्या नेतृत्वाखाली पुणे परिमंडलाने नाट्यस्पर्धेचे यशस्वी आयोजन केले. प्रादेशिक संचालक म्हणून सुनील काकडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालनाची जबाबदारी मृदुला शिवदे व भक्ती जोशी यांनी सांभाळली. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भूपेंद्र वाघमारे यांनी आभार मानले. स्पर्धेच्या पहिल्या दिवशी कोकण प्रादेशिक विभागाचे 'ओल्या भिंती' आणि पुणे प्रादेशिक विभागाचे 'समोरच्या घरात', तर दुसऱ्या दिवशी छत्रपती संभाजीनगर विभागाचे वारी आणि नागपूर प्रादेशिक विभागाचे थलाई कुथल ही नाटके सादर झाली. या नाट्यप्रयोगांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

नागपूर परिमंडळाच्या थलाई कुथल नाटकाची विजयाची मोहोर; नाट्य स्पर्धेचा निकाल

नाट्यनिर्मिती प्रकारात नागपूर परिमंडलाच्या थलाई कुथल नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला, तर कोल्हापूर परिमंडलाचे समोरच्या घरात हे नाटक द्वितीय ठरले. दिग्दर्शनामध्ये 'थलाई कुथल'साठी प्फुल्ल लांडे यांना प्रथम तर 'समोरच्या घरात'साठी अमित बोकील यांना द्वितीय पुरस्कार मिळाला.

नेपथ्याची बाजू सांभाळताना 'समोरच्या घरात'चे विठ्ठल पाटील प्रथम आणि 'थलाई कुथल'च्या प्रिती फुले द्वितीय ठरल्या. प्रकाशयोजनेत सुजाता सोनटक्के ('थलाई कुथल') यांनी प्रथम तर आशिष मेहता ('समोरच्या घरात') यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. पार्श्वसंगीतासाठी धर्मदीप फुलझेले ('थलाई कुथल') प्रथम आणि आशिष कासार ('वारी') द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. रंगभूषा व वेशभूषेत समिधा लोहरे ('थलाई कुथल') प्रथम तर दत्तात्रय भणगे ('समोरच्या घरात') द्वितीय आले.

अभिनयाच्या क्षेत्रात, उत्कृष्ट अभिनेत्याचा प्रथम पुरस्कार 'समोरच्या घरात' नाटकातील श्रीरंग विजयकर यांच्यासाठी जयतीर्थ सांगलीकर यांना, तर द्वितीय पुरस्कार 'थलाई कुथल'मधील अण्णा या भूमिकेसाठी असित रामटेके यांना मिळाला. उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून 'समोरच्या घरात'च्या अनुराधा भूमिकेसाठी श्वेता सांगलीकर प्रथम तर 'ओल्या भिंती'मधील आईच्या भूमिकेसाठी प्रणाली निमजे द्वितीय ठरल्या.

याशिवाय, पौर्णिमा पुरोहित ('समोरच्या घरात' - कृष्णाक्का), दिपाली नरवडे ('वारी' - सगुणा), संगीता चव्हाण ('ओल्या भिंती' - मेघा) आणि प्रशांत मडावी ('थलाई कुथल' - रामानुज अण्णा) यांना उत्तेजनार्थ पारितोषिके जाहीर झाली आहेत.

थोडक्यात

स्वच्छता पंधरवड्यानिमित्त पीएमश्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा, चाचेर येथे विविध उपक्रम



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

स्वच्छता पंधरवड्याच्या अनुषंगाने पीएमश्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा चाचेर येथे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम उत्साहात राबविण्यात आले. कार्यक्रमांतर्गत स्वच्छता शपथ व स्वच्छता जनजागृती दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन, घोषवाक्य लेखन, चित्रकला, वक्तृत्व, वक्तृत्व प्रश्नमंजुषा आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून स्वच्छतेचा संदेश प्रभावीपणे मांडला. तसेच आरोग्यवर्धिनी उपकेंद्र, चाचेर येथे विद्यार्थ्यांनी भेट देऊन आरोग्यविषयक माहिती जाणून घेतली. आयुर्वेद दिनानिमित्त आरोग्य अधिकारी धुर्वे यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य, आयुर्वेदिक जीवनशैली व निरोगी जीवनाबाबत मार्गदर्शन केले. यानंतर विद्यार्थ्यांनी परिसर भेट देऊन स्वच्छतेची पाहणी केली तसेच परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत जनजागृती केली.

बालसभेचे आयोजन करून विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण झाली. या संपूर्ण उपक्रमात शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन सहारे, उपाध्यक्ष शुभांगी आंबीलडुके, मुख्याध्यापक अनिल गडपायले, पदवीधर शिक्षक रविंद्र घुगे,परविन शेख, भारती साखरकर, प्रीती खंगार, संगीता बालकोटे, उकुड्डे ,रुचीला खंडाईत व नेहा निमजे यांचा सक्रिय सहभाग व मार्गदर्शन लाभले. स्वच्छ शाळा, सुंदर शाळा, निरोगी विद्यार्थी आणि स्वच्छ परिसर हा संदेश देत स्वच्छता पंधरवड्यातील विविध उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडले.

कर्तव्य बजावताना प्राणार्पण करणाऱ्या वीर पोलिसांना चंद्रपूरमध्ये भावपूर्ण आदरांजली



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर - धनंजय पांढरे

देशाची शांतता, सुरक्षितता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखताना कर्तव्याचा मार्गावर आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर पोलिसांच्या सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करण्यासाठी बुधवार, २१ ऑक्टोबर रोजी चंद्रपूर पोलीस मुख्यालयातील हुतात्मा स्मारक मैदानावर पोलीस स्मृतीदिन गांभीर्यपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी देशासाठी हौतात्म्य पत्करलेल्या शूर पोलीस जवानांना पुष्पचक्र अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी वसुमना पंत (भा.प्र.से.) उपस्थित होत्या. चंद्रपूर महानगरपालिकेचे आयुक्त अकुनूरी नरेश (भा.प्र.से.), पोलीस अधीक्षक आयुष नोपानी (भा.पो.से.) आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे (म.पो.से.) यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. कर्तव्य बजावताना देशासाठी सर्वोच्च बलिदान देणाऱ्या हुतात्मा पोलिसांच्या स्मृतींना अभिवादन करत उपस्थितांनी त्यांच्या शौर्याचे आणि त्यागाचे स्मरण केले. यावेळी हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून वीर जवानांना मानवंदना देण्यात आली. या सोहळ्यात शहीद जवानांचे कुटुंबीय विशेषत्वाने उपस्थित होते. जिल्हा प्रशासन आणि पोलीस दलाच्या वतीने त्यांच्या त्यागाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

या कार्यक्रमात सहायक पोलीस अधीक्षक तथा राजुरचे उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार सुशांत, मुलचे उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले, गडचांदूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र जाधव, चंद्रपूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद चौगुले, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक सचिन खैत्रे यांच्यासह शहरातील विविध पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच एसएफपीएफचे अधिकारी आणि जवान सहभागी झाले होते.यावेळी शांतता समितीचे सदस्य, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, पोलीस मित्र आणि पत्रकार बांधवही उपस्थित होते. समाजात शांतता, सुरक्षितता आणि सुव्यवस्था कायम राखण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्मा पोलिसांचे योगदान कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या शौर्याचा आणि त्यागाचा आदर्श सदैव प्रेरणा देत राहील, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. हुतात्म्यांना शोकप्रणाम अर्पण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेसाठी अर्ज भरण्यास २८ ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २० डिसेंबर २०२६ रोजी घेण्यात येणाऱ्या 'राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना' परीक्षेच्या ऑनलाइन शाळा नोंदणी व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्याच्या वेळापत्रकात तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या प्रसिद्धीपत्रकानुसार, शाळा व विद्यार्थ्यांना नियमित शुल्कासह ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी आता २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या तृतीय सुधारित वेळापत्रकानुसार विलंब शुल्क व अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्रे भरणे लागू राहणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. शाळा नोंदणी व विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्याची संपूर्ण प्रक्रिया परिषदेच्या https://www.mscepune.in आणि https://mscenmms.in या अधिकृत संकेतस्थळावर सुरु आहे. दि. २८ ऑक्टोबर २०२६ नंतर विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अथवा ऑफलाइन पद्धतीने आवेदनपत्र भरता येणार नाही, याची सर्व संबंधित शाळा, मुख्याध्यापक आणि विद्यार्थ्यांनी काटेकोर नोंद घ्यावी, असे निर्देश महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दिले आहेत.

राज्यस्तरीय बाल चित्रकला २०२६ स्पर्धेत तोंडलीच्या टिटीक्षु मतेचा जिल्ह्यात प्रथम क्रमांक!

तोंडलीच्या शिरपेचात मानाचा तुरा; कला विकासातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला नवी झळाळी

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

राज्यस्तरीय बाल चित्रकला स्पर्धा २०२६ चा जिल्हास्तरीय निकाल नुकताच जाहीर झाला असून, या स्पर्धेच्या पहिल्या गटातून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली, केंद्र धानोली, पंचायत समिती मौदा येथील इयत्ता दुसरीचा विद्यार्थी टिटीक्षु गुणवंत मते याने प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. त्याच्या या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक व कलात्मक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.



विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्नशील असलेली जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडली शैक्षणिक प्रगतीसोबतच कला विकासालाही विशेष महत्त्व देत आहे. चित्रकला, हस्तकला, विविध शालेय स्पर्धा आणि नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचे काम शाळेत सातत्याने केले जाते. विविध स्पर्धांमध्ये आत्मविश्वासाने सहभागी होणारे विद्यार्थी नवनवीन कला आत्मसात करण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतात.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देतानाच त्यांच्या शारीरिक, भावनिक, मानसिक व बौद्धिक विकासासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे आणि सहशिक्षक निलेश जाधव सातत्याने प्रयत्नशील असतात. कृतीतून शिक्षण, उपक्रमांचे प्रात्यक्षिक आणि विद्यार्थ्यांना स्वतःच्या कल्पना व्यक्त करण्याची संधी या माध्यमांतून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यावर शाळेचा भर असतो. टिटीक्षु मते याने मिळवलेले हे यश म्हणजे विद्यार्थ्यांच्या कलात्मक आवडीला मिळालेली दाद आणि शिक्षकांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शनाला मिळालेले यश आहे. या यशामुळे शाळेतील इतर विद्यार्थ्यांनाही चित्रकला व इतर कलांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच कलागुणांना प्रोत्साहन देत गुणवत्तेची नवी शिखरे गाठण्याच्या दिशेने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तोंडलीची यशस्वी वाटचाल सुरू आहे. टिटीक्षुच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शेगांवची भक्तिगंगा कोराडीच्या महालक्ष्मी मंदिरात अवतरणार!

१५ नोव्हेंबरला श्रींची नागपूर-कोराडी भव्य पायदळ दिंडी यात्रा; २० किलोमीटरच्या भक्तिमय प्रवासात सहभागी होण्याचे भाविकांना आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री संत गजानन महाराजांच्या भक्तांसाठी श्रद्धा, भक्ती आणि चैतन्याचा अनोखा सोहळा ठरणारी श्रींची नागपूर - कोराडी पायदळ दिंडी यात्रा रविवार, १५ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आली आहे. श्री संत गजानन महाराज सेवा ट्रस्ट, निर्मल नगरी, नागपूर यांच्या वतीने आयोजित या यात्रेच्या माध्यमातून शेगावची भक्तिगंगा कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात अवतरणार आहे. या दिंडी यात्रेत मोठ्या संख्येने भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



श्री संत गजानन महाराजांच्या भक्तीचा जागर करत निघणारी ही पायदळ दिंडी नागपूर आणि कोराडी परिसरातील भाविकांसाठी विशेष धार्मिक महत्त्वाची ठरणार आहे. श्रींच्या नामस्मरणात, भजन-कीर्तनात आणि भक्तिमय वातावरणात सुमारे २० किलो मीटरचे अंतर पार करून दिंडी कोराडी येथील श्री महालक्ष्मी जगदंबा माता मंदिरात पोहोचणार आहे. या यात्रेमुळे भाविकांना एकत्र येऊन सामूहिक भक्तीचा आनंद अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

'गण गण गणांत बोते'च्या गजराने वर्धा नगरी दुमदुमली, श्री गजानन महाराज पादुका दर्शन सोहळा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा

'गण गण गणांत बोते' च्या जयघोषात आणि कमालीच्या भक्तीमय वातावरणात वर्धा नगरीत श्री गजानन महाराज पादुका दर्शन सोहळा अत्यंत उत्साहात आणि भाविकांच्या अथांग उपस्थितीत संपन्न झाला आहे. श्री गजानन महाराज पादुका संस्थान, श्रीक्षेत्र मुंडगाव (जि. अकोला) यांच्या वतीने वध्यार्तील टेलिकॉम नगर, बायपास रोड म्हासाळा येथे श्री नितीन बाबाराव सुकळकर यांच्यावतीने श्री गजानन महाराजांच्या मूळ चरण पादुकांचा दर्शन सोहळा दिनांक २२ व २३ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या हत्या घरी आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी पादुकांचे पूजन, सत्कार समारंभ आणि हरिनामाचा गजर यांसारख्या धार्मिक कार्यक्रमांचे हरिपाठ, कीर्तन काकडा आरती व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. श्री गजानन महाराजांनी १९०६ मध्ये आपल्या भक्तांना दिलेल्या मूळ प्रासादिक चरण पादुकांचे दर्शन भाविकांना या निमित्ताने मिळाले.

श्री गजानन महाराज यांच्या मूळ व प्रासादिक पादुकांचे प्रमुख आणि ऐतिहासिक ठिकाण श्री गजानन महाराज पादुका संस्थान, मुंडगाव (ता. अकोट, जि. अकोला) येथे आहे. श्री गजानन महाराजांनी १९०६ मध्ये पहिली व १९०८ मध्ये दुसरी पादुकांचा प्रसाद दिला होता. महाराजांचे भक्त ज्यामसिंग शेखावत यांच्या वाड्यावर व पुंडलिक भोकरे यांना दिलेल्या या मूळ पादुका येथे जतन केल्या आहेत.

ज्ञान प्रचारक उपासिका रुमी यांची भारतरत्न आदर्श शाळा, घोटमुंढरी येथे सदिच्छा भेट

दै. सिंहवाणी वृत्त
किशोर साहू : मौदा



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा, घोटमुंढरी पंचायत समिती, मौदा येथे उपासिका रुमी (बुक्क्यो डेंडो क्योकाई, टोकियो, जपान), भंते डॉ. चंद्रकीर्ती (विभागप्रमुख, स्वामी विवेकानंद सुभारती विद्यापीठ, मेरठ, उत्तर प्रदेश), डॉ. निरज पुरी (जपानी भाषा अनुवादक) आणि शिक्षक पुरुषोत्तम शहरे (मुजबी, जिल्हा भंडारा) यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना जपानी भाषा, संस्कृती, जीवनशैली आणि सामाजिक मूल्यांची ओळख करून घेण्याची अनोखी संधी मिळाली.

या भेटीदरम्यान उपासिका रुमी यांनी विद्यार्थ्यांशी जपानी भाषेत संवाद साधला. जपानी भाषेतील संवाद विद्यार्थ्यांना समजावा यासाठी डॉ. पुरी यांनी अनुवादकाची भूमिका पार पाडली. त्यामुळे विद्यार्थ्यांना पाहुण्यांचे विचार आणि मार्गदर्शन समजून घेता आले. या संवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये परदेशी भाषा आणि संस्कृतीविषयी कुतूहल निर्माण झाले. यावेळी जपानी संस्कृती, जपानी लोकांची शिस्त, एकमेकांशी आदरपूर्वक वागण्याची पद्धत, परस्पर सहकार्य, नम्रता आणि दैनंदिन जीवनातील शिष्टाचार यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. जपानी समाजातील शिस्तप्रियता, वेळेचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या मूल्यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली.

या प्रसंगी पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वितरण करण्यात आले. पुस्तकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची व्याप्ती वाढावी आणि अभ्यासाची प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील महत्त्वाचा उद्देश होता.

शाळेतील विद्यार्थ्यांची शिस्त, शैक्षणिक गुणवत्ता, शिकण्याची आवड आणि शिक्षकांचे विद्यार्थ्यांप्रती असलेले समर्पण पाहून उपस्थित पाहुण्यांनी भरभरून कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेतील शिक्षक करीत असलेल्या प्रयत्नांचेही त्यांनी विशेष अभिनंदन केले. या भेटीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उपासिका रुमी यांनी शाळेच्या व्हिजिट रजिस्टरमध्ये जपानी भाषेत आपले मनोगत व्यक्त करून भेटीच्या आठवणी नोंदविल्या. शाळेसाठी हा क्षण विशेष आनंदाचा आणि अभिमानाचा ठरला.

यावेळी केंद्रप्रमुख इंद्रायणी थुलकर,शाळेचे मुख्याध्यापक विकास धारगावे, ग्रा प सदस्य मोसमी घरडे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आयोजन शिक्षक सुदेन्दु सुखदेव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शाळेतील इतर शिक्षकवृंद मच्छिंद्र कांबळे, द्रोवीना कुळसुंगे, मनोज वंजारी, गोपाल मेळे, सिनगारे, मोनाली पटले, कु. शुल्का ढोरे तसेच आम्रपाली घरडे या कार्यक्रमाला उपस्थित होते. सर्वांच्या सहकार्यामुळे हा कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि प्रेरणादायी वातावरणात पार पडला.

अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय सदिच्छा भेटींमुळे विद्यार्थ्यांना विविध देशांच्या भाषा, संस्कृती आणि जीवनमूल्यांची माहिती मिळते. विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन व्यापक होण्यास, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होण्यास आणि जागतिक स्तरावरील ज्ञानाची ओळख होण्यास मदत होते. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा, घोटमुंढरी येथे आयोजित हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी निश्चितच संस्मरणीय आणि प्रेरणादायी ठरला.

थोडक्यात

नागपूर मेसोनिक फ्रॅटर्निटीतर्फे आरजीएम सराफ आणि आरजीएम-नियुक्त तरुण श्रीवास्तव यांचा सत्कार



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रिजनल ग्रँड लॉज ऑफ वेस्टर्न इंडियाचे रिजनल ग्रँड मास्टर सुभाष लक्ष्मण सराफ आणि RGLWI चे रिजनल ग्रँड मास्टर-डिझिग्नेट तरुण श्रीवास्तव यांचा नागपूर मेसोनिक परिवारात गुरुवारी सायंकाळी सिव्हिल लाइन्स येथील फ्रीमेसन्स हॉलमध्ये आयोजित एका शानदार समारंभात सत्कार करण्यात आला. RGLWI चे माजी RGM, डॉ. यज्ञेश ठाकर, ओएसएम, हे प्रमुख पाहुणे होते\ त्यांच्या सत्काराला उत्तर देताना, सुभाष सराफ यांनी पश्चिम विभागातील संपूर्ण मेसोनिक बंधुवर्गाला फ्रीमेसनरीची इमारत आणखी मजबूत करण्याचे आवाहन केले. त्यांनी लॉजेसना मानवतेच्या सेवेसाठी अधिक प्रकल्प हाती घेऊन संस्थेचा परोपकारी ठसा विस्तारण्याचे आवाहन केले. "अशी निस्वार्थ परोपकाराची कृत्ये," त्यांनी जोर देऊन सांगितले, "बीच आपली बंधुप्रेम, मदत आणि सत्य या कालातीत तत्त्वांची खरी रूपे आहेत आणि समाजात त्यांचा प्रकाश पसरवण्याचा हा सर्वात प्रभावी मार्ग आहे."

नवनियुक्त आरजीएम तरुण श्रीवास्तव यांनी बंधूंना आश्वासन दिले की, ते या विभागातील हजारो मेसनांच्या संपूर्ण पाठिंब्याने आणि सहकार्याने पश्चिम विभागातील लॉजेसना अधिक चैतन्यमय आणि सक्रिय बनवण्यासाठी कठोर प्रयत्न करतील. आपल्या भाषणात डॉ. यज्ञेश ठाकर म्हणाले की, तरुण श्रीवास्तव हे फ्रीमेसनरीसाठी अत्यंत समर्पित आहेत. सर्व लॉजेसच्या बंधूंशी त्यांचे घनिष्ठ संबंध असून त्यांचा स्वभाव मदतशील आहे. तरुण श्रीवास्तव आपली नवीन जबाबदारी यशस्वीपणे पार पाडतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. डॉ. यज्ञेश ठाकर यांनी सुभाष सराफ यांना शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणे, आरजीएम सुभाष सराफ यांनी आरजीएम पदसिद्ध तरुण श्रीवास्तव यांचा सत्कार केला. या प्रसंगी स्वदेश भार्गव, सरोश दोडी, रवींद्र तिवारी, मंगेश शास्त्री, विनायक केवडकर, अंजन बिस्वास, प्रवीण कोटेश्वर, संजय चतुर्वेदी, नीलिमा श्रीवास्तव, विविध लॉजेसचे मास्टर्स आणि सचिव, तसेच ग्रँड लॉज ऑफ इंडिया आणि रिजनल ग्रँड लॉज ऑफ वेस्टर्न इंडियाचे अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

वाडीत पदवीधर मतदारसंघाची निवडणूक शांततेत; तीन मतदान केंद्रांवर मतदान

काही मतदारांची नावे बेसा केंद्रावर; मतदानासाठी मतदारांना करावा लागला गोंधळाचा सामना



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक वाडी नगर परिषद कार्यालयातील तीन मतदान केंद्रांवर शांततेत पार पडली. नगरपरिषद कार्यालयात एकूण तीन बूथवर १६९३ मतदानापैकी १०२२ मतदान झाले असून एकूण मतदानाच्या ६०.३६ टक्के मतदान झाल्याचे कळविण्यात आले. वाडी नगर परिषद कार्यालयात पहिल्यांदाच पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी तीन मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली होती. त्यामुळे स्थानिक मतदारांना वाडीतच मतदानाची सुविधा उपलब्ध झाली. मात्र, वाडी परिसरातील काही मतदारांची नावे बेसा येथील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असल्याने संबंधित मतदारांमध्ये गोंधळ निर्माण झाला. मतदानासाठी केंद्रावर पोहोचल्यानंतर मतदार यादीत नाव शोधताना काही मतदारांना अडचणींचा सामना करावा लागला. त्यामुळे आपल्या नावाची नोंद नेमक्या कोणत्या मतदान केंद्रावर आहे, याबाबत मतदारांत संभ्रम निर्माण झाला.

दरम्यान, वाडी नगर परिषद कार्यालयातील तीनही मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रांवर आवश्यक व्यवस्था करण्यात आली होती. पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी वाडीत प्रथमच तीन केंद्रांची व्यवस्था झाल्याने या निवडणुकीची स्थानिक पातळीवर विशेष चर्चा होती. मतदानादरम्यान कुठल्याही प्रकारचा गोंधळ होऊ नये यासाठी पोलिसांचा तगडा बंदोबस्त होता.

नवीन बाबुळखेडा येथील सार्वजनिक विहिरीत गटाराचे पाणी, भारत निर्माण आंदोलनातर्फे निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नवीन बाबुळखेडा येथील मैत्री बुद्धविहार परिसरात गौरधन बागडे व महेंद्र भिवगडे यांच्या घरासमोरील सार्वजनिक विहिरीत गटाराचे पाणी मिसळत असल्याची समस्या निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवर विहिरीची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यात यावी, या मागणीसाठी भारत निर्माण आंदोलनातर्फे नागपूर महानगरपालिकेच्या धंतोली झोन येथील सहाय्यक आयुक्तांना निवेदन देण्यात आले. संतोष भुजाडे, नागपूर जिल्हा संघटक यांच्या नेतृत्वाखाली, योगेश ज्ञानेश्वर धोटे पाटील यांच्या आयोजनात तसेच मनोज वैद्य, प्रभाग क्र. ३३ चे संघटक, यांच्या मार्गदर्शनाखाली हे निवेदन दिले. यावेळी भारत ठाकरे, महेंद्र भिवगडे, दर्शन जावडे, तुषार ढबाले, आशिष खुबाळकर, बागडे साहेब यांच्यासह भारत निर्माण आंदोलनाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

नागपूर येथे 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६' चे जनजागृती सत्र

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत व महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीच्या पुढाकाराने 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज' उपक्रमाअंतर्गत नुकतेच नागपूर येथे जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.श्रीकांत पाटील प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त श्रीमती नीता औघड, आयआयएम (नक्ट) नागपूर, इन्क्युबेशन फाउंडेशन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संशोधन व इनक्युबेशन फाउंडेशन चे



प्रतिनिधी व मंत्रालयातील प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. वैनगंगा इनक्युबेशन फाउंडेशन येथे आयोजित विशेष संवाद सत्रात महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीची भूमिका आणि स्टार्टअप्ससाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांवर सखोल चर्चा झाली. यामध्ये विशेषतः 'सेवा फर्स्ट इनोव्हेशन चॅलेंज २०२६', 'महाराष्ट्र स्टार्टअप वीक' आणि महिला उद्योजकांसाठी उपलब्ध असलेल्या संधींची माहिती देण्यात आली. नवकल्पनांना प्रोत्साहन देणे, स्टार्टअप्सना शासकीय विभागांशी जोडणे आणि सामाजिक समस्यांवर नाविन्यपूर्ण उपाय विकसित करणे या प्रमुख उद्देशांवर यावेळी विशेष भर देण्यात आला.

प्रत्यक्ष चर्चेत सहभागी होऊन विविध शासकीय योजनांचा व उपक्रमांचा लाभ कसा घ्यावा, याबाबत उपस्थित नवउद्योजकांना यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

या आयोजनासाठी वर्धा मार्गावरील डोंगरगाव येथील वैनगंगा कॉलेज ऑफ इंजिनीरिंग अँड मॅनेजमेंटच्या वैनगंगा इनक्युबेशन फाउंडेशन होस्ट संस्थेने या कार्यक्रमासाठी स्थानिक समन्वय साधला. पात्र स्टार्टअप्स व नवउद्योजकांपर्यंत या उपक्रमांची माहिती पोहोचवून त्यांना जास्तीत जास्त सहभागासाठी प्रोत्साहित करणे हा यामागचा मुख्य हेतू होता.

किट्समध्ये तीन दिवसीय गरबा उत्सव



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

कविकुलगुरू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (किट्स), रामटेक येथील सांस्कृतिक मंडळाच्या वतीने १५ ते १७ ऑक्टोबरदरम्यान तीन दिवसीय गरबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले. या उत्सवात विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत उत्साहाने सहभागी होत भारतीय संस्कृती, परंपरा आणि एकतेचा संदेश दिला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश श्रीखंडे यांच्या हस्ते उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. रंगीबेरंगी सजावट, आकर्षक रोषणाई आणि ढोलाच्या तालावर संपूर्ण परिसर उत्सवी वातावरणाने भारावून गेला.

उत्सवाच्या अंतिम दिवशी गरबा स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांनी नृत्यकौशल्य, पारंपरिक वेशभूषा आणि सर्जनशीलतेचे दर्शन घडविले. स्पर्धेच्या परीक्षक मंडळात डॉ. पंकज आष्टणकर, ज्योती बडवाईक आणि वर्षा चौधरी यांचा समावेश होता. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

प्राचार्य डॉ. श्रीखंडे यांनी विजेत्यांसह सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. डॉ. कृष्णा पडोळे यांनी संस्थेचे सचिव व्ही. श्रीनिवास राव, कार्यकारी संचालक व्ही. प्रणव, अधिष्ठाता डॉ. पंकज आष्टणकर, वसतिगृह अधिष्ठाता डॉ. ई. शिव प्रसाद तसेच प्राध्यापकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यार्थी अध्यक्ष जान्हवी भुजाडे, उपाध्यक्ष ऋशीकेश अंबेपवार आणि आयोजन समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

ग्रंथालय व माहिती विभागातर्फे ग्रंथ प्रदर्शनातून वाचन प्रेरणा दिवस साजरा

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक : विद्यासागर कला महाविद्यालय खैरी (बिजेवाडा),रामटेक येथे भारताचे अकरावे राष्ट्रपती,महान वैज्ञानिक डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती व धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरेश सोमकुवर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम आयोजित केला गेला. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलम यांच्या प्रतिमेला अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाविद्यालयातील इंग्रजी विभागाचे डॉ.रवींद्र पानतावणे यांनी कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती भूषवली तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान समन्वयक तथा इंग्रजी विभागप्रमुख डॉ. सावन धर्मपुरिवार यांनी स्वीकारले.



ग्रंथपाल डॉ.आशिष ठाणेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्र तथा प्रास्ताविक मांडले.विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर व डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम आणि इतर महामानवांचे विचार आत्मसात केले तरच विद्यार्थी दशेतून समोर गेल्यावर व्यक्ती समृद्ध जीवन जगू शकेल असे प्रतिपादन डॉ.रवींद्र पानतावणे यांनी केले तर डॉ.सावन धर्मपुरीवार यांनी त्यांच्या भाषणातून महामानवांचे जणू जीवनदर्शनच घडवून आणले.कार्यक्रमाचे आभार प्रा.रणजित वायसे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.ज्योती कवठे,डॉ.सतीश महल्ले,डॉ.विलास जावभाये,प्रा.गंगा मोंढे,प्रा. रणजित वायसे,किर्ती जयस्वाल,युनुस पठाण, सर्व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान, बुद्ध-धम्म आणि महापुरुषांच्या विचारांची पुस्तके मोफत वाटप, रिपब्लिकन विद्यार्थी संघटनेचा उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



७० व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त रिपब्लिकन विद्यार्थी संघटना, नागपूर शहरच्यावतीने भारतीय संविधान तसेच बुद्ध आणि धम्म, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे आणि मुकनायक यांसारख्या विषयांवरील पुस्तकांचे शेकडो धम्म अनुयायांना मोफत वाटप करण्यात आले. समाजात संविधानिक मूल्यांची रुजवणूक व्हावी, महापुरुषांचे विचार सर्व सामान्यांपर्यंत पोहोचावेत आणि वाचनसंस्कृतीला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

संघटनेच्या शहराध्यक्ष मोहिनी बारमासे यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मत्स्य व बांधारे विभागाचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे राज्यमंत्री दर्जा प्राप्त प्रेमकुमार गजभिये यांच्या हस्ते सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिक बुद्धवंदना घेऊन महापुरुषांच्या विचारांना अभिवादन केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधान, बुद्ध आणि धम्म तसेच महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, अण्णाभाऊ साठे आणि मुकनायक यांच्याशी संबंधित विविध पुस्तकांचे मोफत वितरण करण्यात आले.

पुस्तके मिळाल्याने अनेक धम्म अनुयायांनी समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाला आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे, अँड. लुबेश मेश्राम, संघटक देवेंद्र बागडे, माजी जिल्हा परिषद सदस्य दिनेश बनसोड, कवीवर्य तनुजा नागपुरी, सुमित बनसोड, विक्रम भारद्वाज, सुधीर मुठचरे आणि अँड. खोब्रागडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या उपक्रमातून संविधान, सामाजिक समता, बंधुता आणि महापुरुषांच्या परिवर्तनवादी विचारांचा प्रसार करण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी मार्गदर्शन करताना आंबेडकरी विचार मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायणराव बागडे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. जगात प्रत्येक व्यक्तीला संपत्ती, मान- सन्मान, मोक्ष, धन आणि विविध प्रकारच्या प्राप्तीची अपेक्षा असते; मात्र नागपूरच्या पवित्र दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो लोकांच्या साक्षीने विज्ञाननिष्ठ, समताधिष्ठित आणि मानवतावादी विचारांचा स्वीकार करण्याचा मार्ग दाखविला. हा केवळ धार्मिक परिवर्तनाचा प्रसंग नव्हता, तर सामाजिक विषमता आणि अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या ऐतिहासिक परिवर्तनाची सुरुवात होती, असे त्यांनी प्रतिपादन केले.

वाडीतील पोलिसांवरील हल्ला प्रकरणात तिघांची निर्दोष मुक्तता

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊन दरम्यान दुकाने जबरदस्तीने बंद करण्यास विरोध करणाऱ्या वाडी पोलिसांच्या दोन कर्मचाऱ्यांवर जमावाने हल्ला केल्याच्या प्रकरणात अतिरिक्त सत्र न्यायालयाने तीन आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात पोलिसांनी केवळ चार युवकांविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. मात्र, खटल्याच्या सुनावणीदरम्यान अभियोग पक्षाला आरोपींवरील आरोप ठोस पुराव्यांच्या आधारे सिद्ध करता आले नाहीत. प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्यास झालेला विलंब, पोलीस ठाण्यातच घेण्यात आलेली ओळख परेड आणि साक्षीदारांच्या जबाबांमधील विसंगती या बाबी न्यायालयाने महत्त्वपूर्ण मानल्या. निर्दोष मुक्तता झालेल्या आरोपींमध्ये पवन प्रेमदास गोंडाणे, रोहन कैलास राऊत आणि संजय उर्फ सुधीर कैलास राऊत यांचा समावेश आहे. या प्रकरणातील चौथा आरोपी दीपक रवी अटणकर याचा १५ मे २०२५ रोजी मृत्यू झाल्याने त्याच्याविरुद्धची कार्यवाही निकाली काढण्यात आली होती. कोरोना महामारीच्या काळात, १५ मे २०२० रोजी सायंकाळी सुमारे ६.४५ वाजताच्या सुमारास ही घटना घडली होती. वाडी पोलीस ठाण्यात कार्यरत असलेले पोलीस शिपाई सुरेश काक्कडे आणि पोलीस कर्मचारी रंजीत धनेकर हे बीट मार्शल म्हणून कर्तव्य बजावत होते. दोघेही मोहदे लेआउट परिसरातील आठवा मैल भागात गस्त घालत होते.

लॉकडाऊनच्या काळात सुरू ठेवण्यास परवानगी असलेली काही दुकाने काही युवक जबरदस्तीने बंद करण्याचा प्रयत्न करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलीस कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. त्यावेळी संबंधित युवक आणि पोलिसांमध्ये वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि जमावातील नागरिकांनी काठ्यांच्या साहाय्याने पोलिसांवर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला.

कामावरून कमी केल्याच्या तणावात महावितरण कर्मचाऱ्याचा मृत्यू?

नितेश खरपुरीयाचा मृतदेह महावितरण कार्यालयात आणून नातेवाइकांचा ठिय्या; तीन तास आंदोलन, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, काटोल / नरखेड

काटोलमध्ये महावितरण विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्याच्या मृत्यूने खळबळ उडाली आहे. नितेश शिवाजी खरपुरीया (रा. पावर हाऊस परिसर, काटोल) यांचा २२ ऑक्टोबर रोजी सकाळी हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. पंधरा दिवसांपूर्वी कामावरून कमी केल्याने ते मानसिक तणावात होते, असा आरोप नातेवाइकांनी केला आहे. या घटनेनंतर संतप्त नातेवाइकांनी नितेश यांचा मृतदेह थेट महावितरण कार्यालयात आणून ठेवला. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी आणि कुटुंबाला न्याय द्यावा, या मागणीसाठी सुमारे तीन तास ठिय्या देण्यात आला.

नितेश खरपुरीया हे मागील तीन वर्षांपासून महावितरण विभागात कंत्राटी पद्धतीने कार्यरत होते. २०२२ मध्ये त्यांचा विवाह झाला होता. त्यांच्या पश्चात अडीच वर्षांची मुलगी आणि अवघ्या एक महिन्याची चिमुकली आहे. कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी नितेश यांच्यावरच होती. अशा परिस्थितीत त्यांना पंधरा दिवसांपूर्वी कामावरून कमी करण्यात आल्याचे नातेवाइकांचे म्हणणे आहे.

लेखी आदेश नाही, केवळ फोनवरून कामावरून कमी केल्याची माहिती ?



नितेश यांना कामावरून कमी करण्याबाबत कोणतेही लेखी पत्र देण्यात आले नसून, केवळ फोनवरून त्यांना कामावरून कमी केल्याचे सांगण्यात आले, असा आरोप नातेवाइकांनी केला. कुटुंबाची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना पुन्हा कामावर घ्यावे, अशी विनंतीही संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आल्याचे सांगण्यात येते. मात्र, या विनंतीला प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे.

कामावरून कमी केल्याच्या घटनेनंतर नितेश मानसिक तणावात होते आणि त्यानंतर त्यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला, असा दावा नातेवाइकांनी केला. या आरोपांची निष्पक्ष चौकशी होऊन कामावरून कमी करण्याचा निर्णय कोणी घेतला, त्यामागील कारणे काय होती आणि नियमानुसार प्रक्रिया पाळण्यात आली होती का, याची तपासणी करण्याची मागणी आता जोर धरत आहे. मात्र, कामावरून कमी करणे आणि मृत्यू यांच्यातील वैद्यकीय संबंध अद्याप स्पष्ट झालेला नाही.

कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्येही संताप

या घटनेमुळे महावितरण विभागातील अन्य कंत्राटी कर्मचाऱ्यांमध्येही नाराजी व्यक्त होत आहे. आज नितेश यांच्यावर ओढवलेली परिस्थिती उद्या आपल्यावरही येऊ शकते, अशी भीती कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्याचे समजते. कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या रोजगाराची सुरक्षितता, कामावरून कमी करताना पाळली जाणारी प्रक्रिया आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्याचा प्रश्न या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे.

नितेश यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. एकीकडे पती गमावलेली पत्नी आणि दुसरीकडे वडिलांचे छत्र हरपलेल्या दोन चिमुकल्या मुली या कुटुंबाला आता आधाराची गरज आहे. त्यामुळे केवळ चौकशीचे आश्वासन न देता, वस्तुस्थिती स्पष्ट करून जबाबदारी निश्चित करावी आणि दोष आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी नातेवाइकांनी व मित्रमंडळींनी केली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार रणजीत शिरसाट यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय विवेक राऊत व अन्य पोलीस कर्मचारी करणार आहेत.

थोडक्यात

वरळीतील दिव्यांग बांधवाना दिवाळी सणानिमित्त टी-शर्टचे वाटप



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई (रवींद्र मालुसरे)

मुंबई येथील महाराष्ट्रासह गोवा राज्यात विविध सामाजिक आणि शैक्षणिक सातत्याने कार्यरत असणाऱ्या मुंबई येथील शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट'च्या वतीने वरळी मुंबई येथील 'एनएसडी इंडस्ट्रियल होम फॉर द ब्लाइंड' मधील दिव्यांग बांधवाना दिवाळी सणापूर्वी टी-शर्ट्सचे आणि खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी जागतिक ख्यातीचे न्यूरो-स्पाइनल सर्जन आणि ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. पी. एस. रमणी, मानद सचिव भूषण जॅक, अधीक्षक आनंद भुरे, वॉर्डन विवेक मोरे, मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, गंगाराम विश्वकर्मा, शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य अजय कुमार भोसले, संजय कुलकर्णी, विनायक पंडित, दीपक देसाई आणि इतर मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी आपल्या भाषणात डॉ. रमाणी म्हणाले की, या संस्थेशी त्यांचा दीर्घकाळचा संबंध आहे. मी लिहिलेले "ताठ कणा" हे पुस्तक मी ब्रेल लिपीमध्ये अनुवादित करून तुमच्यासाठी वाचनार्थ यापूर्वीच पाठविले आहे. आमची संस्था नेहमीच ग्रामीण भागात सामाजिक बांधिलकी जपत उपक्रम पार पाडीत असते. आज अंध बांधवांसाठी टीशर्टचे वाटप करून या उपक्रमातून दिव्यांग व्यक्तींच्या जीवनात आनंद निर्माण करण्याबरोबरच त्यांना सन्मानाने जगण्यासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करीत आहोत. समाजातील गरजू व्यक्तींना मदतीचा हात देणे, त्यांचा सन्मान राखणे आणि सणांचा आनंद सर्वांसोबत साजरा करणे हाच या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

माणुसकीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे रवींद्र मालुसरे यांनी कौतुक केले तर, दिव्यांग बांधवांच्या कल्याणासाठी हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल अजयकुमार भोसले यांनी 'शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट'चे आभार मानले. भूषण जाक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले आणि संस्थेने कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल सर्व सदस्यांचे आणि शेकडो अंध बांधवांचे आभार मानले. यावेळी आर्थिक परिस्थितीमुळे हर्नियाचे ऑपरेशन थांबले होते अशा रोहिदास कांबळे या दिव्यांग युवकाला संस्थेच्या वतीने तात्काळ पाच हजार रुपयांची मदत करण्यात आली.

शास्त्री शिक्षण संस्थेच्या प्रगती मानकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

श्री शास्त्री शिक्षण संस्थेच्या सदस्या तथा माजी आमदार अशोकराव मानकर यांच्या धर्मपत्नी प्रगती मानकर यांचे शुक्रवार, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. प्रगती अशोकराव मानकर या श्री शास्त्री शिक्षण संस्थेच्या सदस्या म्हणून कार्यरत होत्या. शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांची कामगिरी कौतुकास्पद राहिली आहे. दरम्यान, प्रगती मानकर या अशोक प्रकाशन प्रा. लिमिटेड, स्वयंसिद्धा उद्योग समूह, गायत्री महिला उद्योग, प्रगती एज्युकेशन सोसायटीसह अनेक नामवंत संस्थांच्या संचालिका म्हणूनही कार्यरत होत्या. एवढेच नव्हे तर महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली होती. प्रगती मानकर या काही काळापासून आजारी होत्या. त्यातच शुक्रवारी त्यांना देवाज्ञा झाली. मृत्यूसमयी त्या ६८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती माजी आमदार तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते अशोकराव मानकर, मुली अंकिता वैद्य, डॉ. अपेक्षा गोतमारे, अमृता संगावार यांच्यासह बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मोक्षधाम येथे अन्त्यसंस्कार पार पडला. तत्पूर्वी प्रगती मानकर यांच्या पार्थिवाचे मेडिकल चौकातील निवासस्थानी अनेक मान्यवरांनी अन्त्यदर्शन घेत श्रद्धांजली अर्पित केली. याप्रसंगी कांचन गडकरी, बाबा नंदनपवार, आमदार डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार प्रा. अनिल सोले, आमदार प्रवीण दटके, आमदार कृपाल तुमाने, उदयभास्कर नायर, धनंजय बापट, समीर गौतम, मीरा कडबे, आशीष बडगे, अजय बोढारे, अविनाश ठाकरे, अर्चना डेहनकर, नीलिमा बावणे, जयप्रकाश गुप्ता, सुधीर पारवे, अविनाश खळतकर, संजय निंबाळकर, किशोर कन्हेरे, संजय नाथे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

'विकसित भारत' संकल्पनेतून स्वच्छतेचा जागर, हिवरा शाळेत विविध उपक्रमांचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

केंद्र व राज्य शासनाच्या सेवा संकल्प अभियान तथा 'स्वच्छता ही सेवा' अभियानाच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, हिवरा-हिवरी येथे 'विकसित भारत' या संकल्पनेवर आधारित विविध शैक्षणिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत गोंधळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा, स्वच्छता रॅली, वारली पेंटिंग तसेच जागतिक हृदय दिनानिमित्त जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. यासोबतच शाळेचे कार्यालय, परिसर, वर्गखोल्या आणि स्वच्छतागृहांची स्वच्छता करण्यात आली. या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची आवड, पर्यावरणाविषयी जागरूकता, आरोग्याचे महत्त्व आणि सामाजिक जबाबदारीची भावना रुजविण्याचा प्रयत्न करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपली कलात्मकता, सर्जनशीलता आणि सामाजिक जाणीव यांचे दर्शन घडविले. स्वच्छता रॅलीच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यात आला. तसेच वारली पेंटिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय लोककलेची ओळख करून देण्यात आली. शाळेचे महाराष्ट्र शासन पुरस्कृत मुख्याध्यापक सचिन चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षिका ममता सोनमाने व सृष्टी खंडाळे यांनी या सर्व उपक्रमांचे नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन करून ते यशस्वी केले.

पारधी समाजाला 'जन्मजात गुन्हेगार' मानण्यावर प्रतिबंधाची मागणी

नागपूर जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री व गृहमंत्र्यांकडे निवेदन सादर



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रातील पारधी समाजातील नागरिकांना केवळ जात किंवा समुदायाच्या आधारावर जन्मजात गुन्हेगार, वंशपरंपरागत गुन्हेगार किंवा 'Habitual Offender' म्हणून वागणूक देण्यावर प्रतिबंध घालण्यासाठी स्पष्ट शासन परिपत्रक काढण्याची मागणी करणारे निवेदन आज नागपूर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत मा. मुख्यमंत्री तथा मा. गृहमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सादर करण्यात आले. आदिवासी समशेर सिंग पारधी विकास संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष अनिल गोपीचंद पवार यांनी हे निवेदन सादर केले. यावेळी संघटनेचे अतिश पवार, राहुल राजपूत, शिवसाजन राजपूत, संजय पवार आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, ब्रिटिशकालीन Criminal Tribes Act, १८७१ अंतर्गत काही समुदायांना जन्मजात गुन्हेगार ठरविण्यात आले होते. १९५२ मध्ये हा कायदा रद्द करण्यात आला असला तरी आजही प्रशासकीय व पोलीस पातळीवर पारधी समाजाकडे संशयाच्या नजरेने पाहिले जाते, अशा तक्रारी सातत्याने येत आहेत. Bombay Habitual Offenders Act, १९५९ मध्येही पारधी जातीला किंवा समुदायाला स्वतंत्रपणे 'Habitual Offender' घोषित करण्याची तरतूद नाही. त्यामुळे केवळ जातीय ओळखीच्या आधारावर कोणालाही गुन्हेगार मानणे हे घटनात्मक तत्त्वांशी (अनुच्छेद १४, १५ व २१) विसंगत आहे. संघटनेने शासनाने खालील बाबींवर तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. सर्व पोलीस विभाग, जिल्हा प्रशासन व कारागृह यंत्रणांना स्पष्ट निर्देश देणारे शासन परिपत्रक काढणे, Habitual Offender प्रक्रिया केवळ वैयक्तिक पुरावे व कायदेशीर निकषांवर आधारित असावी. जुन्या ब्रिटिशकालीन नोंदींच्या आधारे आज कोणालाही स्वयंचलितपणे गुन्हेगार न समजण्याबाबत मार्गदर्शक सूचना, पोलीस अधिकाऱ्यांसाठी संवेदनशीलता प्रशिक्षण, जुन्या पोलीस नोंदींचे कायदेशीर पुनरावलोकन, जिल्हास्तरीय तक्रार निवारण यंत्रणा स्थापन करणे, पोलीस महासंचालकांच्या देखरेखीखाली अंमलबजावणी व अनुपालन अहवाल, गृह, विधि व न्याय, आदिवासी विकास विभाग तसेच तज्ज्ञांचा समावेश असलेली अभ्यास समिती गठित करणे, निवेदनात वाशिम जिल्ह्यातील कोठडीतील मृत्यू प्रकरणाचाही उल्लेख करत पोलिसी कारवाईत मानवी प्रतिष्ठा व अनुसूचित जमातीच्या अधिकारांचे रक्षण किती महत्त्वाचे आहे, याकडे शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे.

अनिल पवार म्हणाले, पारधी समाजाला जन्मजात गुन्हेगार म्हणून पाहण्याचा ऐतिहासिक पूर्वग्रह केवळ सामाजिक प्रश्न नाही. तो मानवी प्रतिष्ठा, समानता आणि कायद्याच्या राज्याशी संबंधित गंभीर विषय आहे. जात किंवा समुदाय कुणाच्याही गुन्हेगारीचे प्रमाणपत्र ठरू शकत नाही. शासनाने राज्यव्यापी स्पष्ट परिपत्रक काढून या कलंकाला प्रशासकीय पातळीवर पूर्णविराम द्यावा. निवेदनाची प्रत गृह सचिव, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव, पोलीस महासंचालक, राज्य मानवाधिकार आयोग तसेच सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहे.

आमगाव पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी, १८ हरवलेले मोबाईल शोधून मालकांना परत

CEIR पोर्टलच्या मदतीने २ लाख ३० हजारांचे मोबाईल हस्तगत, मोबाईल परत मिळताच नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद



दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

आमगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतून तसेच परिसरातील विविध ठिकाणांहून मागील चार महिन्यांत हरवलेल्या वेगवेगळ्या कंपन्यांच्या १८ मोबाईल फोनचा शोध घेण्यात आमगाव पोलिसांना यश आले आहे. केंद्र शासनाच्या सेंट्रल इक्विपमेंट आयडेंटिटी रजिस्टर या पोर्टलच्या माध्यमातून तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन एकूण २ लाख ३० हजार रुपये किमतीचे मोबाईल हस्तगत करण्यात आले. हे सर्व मोबाईल २३ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस निरीक्षक निलकंठ घनश्याम कुकडे यांच्या हस्ते संबंधित मोबाईलधारकांना परत करण्यात आले.

आमगाव पोलीस ठाण्यात मागील चार महिन्यांच्या कालावधीत विविध ठिकाणांहून वेगवेगळ्या कंपन्यांचे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत आमगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार पोलीस निरीक्षक निलकंठ कुकडे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अंमलदारांना हरवलेल्या मोबाईलचा तांत्रिक पद्धतीने शोध घेण्याबाबत मार्गदर्शन करून आवश्यक सूचना दिल्या.

दिनांक २३ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस निरीक्षक निलकंठ घनश्याम कुकडे यांच्या हस्ते हे मोबाईल संबंधित मालकांना परत करण्यात आले. हरवलेले मोबाईल पुन्हा आपल्या हाती मिळाल्याने मोबाईलधारकांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून आले. नागरिकांनी आमगाव पोलिसांच्या या कामगिरीबद्दल आभार व्यक्त केले.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक गोरख भामरे, गोंदिया जिल्हा, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे (गोंदिया, कॅम्प-देवरी) यांच्या निर्देशानुसार तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी नंदिनी चांदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या मोहिमेत आमगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलकंठ घनश्यामजी कुकडे, गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अंमलदार पोलीस हवालदार असीम मन्यार , पोलीस शिपाई चेतन शेंडे, पोलीस शिपाई अजय पटले आणि पोलीस शिपाई मिलनसिंग मंजूटे यांनी सहभाग घेतला.

हरवलेल्या मोबाईलचा तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन ते संबंधित मालकांना परत करण्याच्या आमगाव पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

नागपूर जिल्ह्यात २७ ऑक्टोबरला राबविणार राष्ट्रीय जंतनाशक मोहीम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

पौगंडावस्थेतील मुला-मुलींचा शारीरिक व मानसिक विकास व्हावा, त्यांचे आरोग्य उत्तम राहावे व त्यांची पोषण स्थिती, शिक्षण व राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचा उद्देशाने येत्या २७ ऑक्टोबर २०२६ रोजी संपूर्ण जिल्ह्यात 'राष्ट्रीय जंतनाशक मोहीम' राबविण्यात येणार आहे. तसेच ३ नोव्हेंबर २०२६ रोजी 'मॉप अप दिन' आयोजित करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे नुकतीच या मोहिमेच्या पूर्वतयारीची आढावा बैठक पार पडली.

सन २०२६-२७ या वर्षात नागपूर ग्रामीणमधील १ ते १९ वर्षे वयोगटातील एकूण ४ लाख ४० हजार ९९४ लाभार्थींना या मोहिमेअंतर्गत जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. ही मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, एकात्मिक बालविकास विभाग, पाणी पुरवठा विभाग आणि समाजकल्याण विभाग हे सर्व प्रमुख विभाग एकत्रितपणे काम करणार आहेत. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी या मोहिमेच्या अंमलबजावणीबाबत सर्व विभागांना आवश्यक सूचना दिल्या असून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम पार पडणार आहे.

जंताच्या संसर्गामुळे बालकांमध्ये तसेच पौगंडावस्थेतील मुला-मुलींमध्ये कुपोषण व रक्तक्षय (ॲनिमिया) होतो, तसेच थकवा जाणवून शारीरिक व मानसिक वाढ पूर्ण होत नाही. या आजारांचा सामना करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सन २०१५ पासून राष्ट्रीय जंतनाशक दिन साजरा करण्यात येत आहे.

राष्ट्रीय किशोरवयीन आरोग्य कार्यक्रमांतर्गत वर्षातून दोन वेळा १ ते १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींना जंतनाशक गोळी दिली जाते. आतड्यांमधील कृमी दोष हा बालकांमध्ये व किशोरवयीन मुला-मुलींमध्ये होणा?या रक्तक्षय व कुपोषणास मोठ्या प्रमाणावर जबाबदार असून, यामुळे त्यांच्या शिक्षणावर व पुढील आयुष्यावर विपरीत परिणाम होतो. त्यांना लवकर थकवा येतो व अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करता येत नाही. ही बाब लक्षात घेऊन शाळा व अंगणवाडी स्तरावर ही मोहीम प्रभावीपणे राबविली जात आहे.

आढावा बैठकीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) कैलाश घोडके, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत, जिल्हा माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. रेवती साबळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. असीम इनामदार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निवृत्ती राठोड, इंडियन असोसिएशन बालरोग तज्ज्ञ डॉ. संदीप मोगरे, जिल्हा रुग्णालयाचे डॉ. गणेश कांबळे, शिक्षण अधिकारी श्री कांबळे, तसेच डॉ. सरला लाड व इतर समिती सदस्य उपस्थित होते.

जिल्ह्यात राज्यस्तरीय शालेय रायफल शुटिंग क्रीडा स्पर्धांचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नागपूर आणि लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय रायफल शुटिंग क्रीडा स्पर्धा २०२६-२७ चे आयोजन करण्यात आले आहे. दि. २२ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ही स्पर्धा प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालय, हरपूर नगर, उमरेड रोड, मोठा ताजबाग जवळ, नागपूर येथे आयोजित करण्यात आली असून १४, १७ व १९ वर्षे वयोगटातील मुले व मुलींच्या या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातील ९ विभागांमधून ४८६ खेळाडू, ५४ संघ व्यवस्थापक तसेच खेळाडूंसाठी भोजनाची व्यवस्था दुपारी स्पर्धास्थळी आणि सायंकाळी निवासस्थानी करण्यात आली आहे. वेळापत्रकानुसार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी एअर पिस्टल प्रकारांच्या स्पर्धा पार पडल्या आहेत. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी पीप साईट एअर रायफल आणि २५ ऑक्टोबर २०२६ रोजी ओपन साईट एअर रायफल या प्रकारांच्या स्पर्धा पार पडणार आहेत. या राज्यस्तरीय स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी क्रीडा व युवक सेवा नागपूर विभागाचे उपसंचालक महादेव कसगावडे, रेडिओ ऑरेंजच्या सीईओ श्रीमती इनु मजुमदार, लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे संचालक अभिजित देशमुख, प्रियदर्शनी भगवती अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभय शेंडे, ज्योतिबा शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दातारकर, नागपूर डिस्ट्रिक्ट रायफल असोसिएशनचे महासचिव चंद्रकांत देशमुख यांच्यासह स्पर्धक, खेळाडू, विद्यार्थी उपस्थित होते. क्रीडाप्रेमी व खेळाडूंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नागपूरचे जिल्हा क्रीडा अधिकारी शशिकांत कळंबे यांनी केले आहे.

चंद्रपुरात एम.डी. ड्रग्जची विक्री : स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई, २८ वर्षीय तरुण ताब्यात

दै. सिंहवाणी वृत्त,
चंद्रपूर-धनंजय पांढरे



शहरात अमली पदार्थांच्या अवैध विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत एम.डी. मेफेड्रोन ड्रग्ज पावडरसह एका २८ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. शानवाज उर्फ शानू इस्माईल शेख २८ वर्षे रा. अहमदिया मस्जिदजवळ, रामाळा तलाव, चंद्रपूर असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे.

या कारवाईत ६.७३० ग्रॅम एम.डी. ड्रग्ज पावडर, मोबाईल आणि रोख रकमेसह एकूण ४२ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणात नागपूरमधून अमली पदार्थ आणल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली असून, तस्करीच्या जाळ्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.२१ ऑक्टोबर २०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चंद्रपूर शहरात गस्त घालत असताना गोपनीय बातमीदाराकडून माहिती मिळाली की, रामाळा तलाव परिसरातील एक व्यक्ती एम.डी. ड्रग्ज पावडर विक्री करण्याच्या उद्देशाने जमनजेट्टी परिसरात येणार आहे.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी हनुमान मंदिरासमोर, एम.ई.सी.बी. कार्यालयाजवळ सापळा रचला.

मिळालेल्या वर्णनानुसार पांढऱ्या रंगाचा तपकिरी ठिपके असलेला पूर्ण बाह्यांचा शर्ट आणि काळी पँट घातलेला संशयित तेथे येताच पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. राजपत्रित अधिकारी आणि पंचांच्या उपस्थितीत कायदेशीर प्रक्रियेनुसार त्याची अंगझडती घेण्यात आली. यावेळी त्याच्या पँटच्या खिशात प्लास्टिकच्या पन्नीत पांढऱ्या रंगाची एम.डी. ड्रग्ज पावडर, मोबाईल फोन आणि रोख रक्कम आढळून आली. अमली पदार्थ तपासणी किटद्वारे तपासणी केल्यानंतर पावडर अमली पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले.

पोलिसांनी ६.७३० ग्रॅम एम.डी. ड्रग्ज पावडर, ज्याची किंमत २० हजार १९० रुपये आहे, ओप्पो ए-५ प्रो कंपनीचा जुना वापरता मोबाईल, किंमत २० हजार रुपये, तसेच दोन हजार १२० रुपये रोख असा एकूण ४२ हजार ३१० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

प्राथमिक तपासात संबंधित तरुणाने ड्रग्ज पावडर नागपूर येथून विक्रीसाठी आणल्याची माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी चंद्रपूर शहर पोलीस ठाण्यात अमली पदार्थ आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम, १९८५ च्या कलम ८(क) आणि २२(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात आणखी कोणाचा सहभाग आहे, अमली पदार्थांचा पुरवठा कोणामार्फत केला जात होता आणि या व्यवसायाचे जाळे किती विस्तृत आहे, याचा तपास सुरू आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक आयुष नोपानी आणि अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचारे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश हिवसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बलराम झाडोकर, पोलीस उपनिरीक्षक विनोद भुरले, पोलीस उपनिरीक्षक सुनील गौरकार, पोलीस अंमलदार सतीश अवथरे, लालू यादव, इनान खान, संदीप कांबळे, हिरालाल गुप्ता, किशोर वाकाटे, शशांक बदामवार तसेच सायबर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक मुजावर अली यांनी केले.

दैनिक सिंहवाणी वृत्त Epaper : epaper.sinhvani.com दिनांक : शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६

मतदानाचा उत्साह, ६४.७६ टक्के मतदान

नागपूर : ६०.३३ टक्के | चंद्रपूर : ७२.५९ टक्के | भंडारा : ६७.०७ टक्के | गोंदिया : ७१.५३ टक्के | वर्धा : ६८.३७ टक्के | गडचिरोली : ७२.९५












दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : नागपूर पदवीधर निवडणुक मतदानाचा सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साह बघायला मिळाला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्नी कांचन गडकरी व भाजप उमेदवार सुधाकर कोहळे यांच्यासह विधानपरिषदेच्या नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत आज सहपरिवार मतदान केले. यासह काँग्रेसचे उमेदवार अभिजीत वंजारी, राज्यमंत्री पंकज भोयर, कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ. आशिषराव देशमुख व डॉ. आयुश्री आशिषराव देशमुख यांनीही मतदान केले. खासदार डॉ. नामदेव किरसान यांनी आमगाव तहसील कार्यालयातील मतदान केंद्रावर बजावला मतदानाचा हक्क बजावला. राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी सपत्नीक मतदान केले. यासोबत दयाशंकर तिवारी, चंद्रपाल चौकसे, गिरीश पांडव, अनिता पांडव, नागपूर महानगरपालिकेच्या महापौर निता ठाकरे, नगरसेविका भारती बुंदे.

मतदान केंद्रावरील नोंदींमध्ये विसंगतीचा आरोप, दोन बॅलेट पेपर रद्द केल्याची माहिती : डॉ. प्रशांत गायकवाड

सर्वेश्वर नगर येथील मतदान केंद्र क्रमांक १३० वरील प्रकार; आक्षेपानंतर डॉ. गायकवाड यांना नव्याने मतदानाची संधी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सर्वेश्वर नगर येथील अमित उच्चेश प्राथमिक शाळेतील मतदान केंद्र क्रमांक १३०, खोली क्रमांक २ येथे मतदानासाठी गेलेले डॉ. प्रशांत गायकवाड यांनी मतदान प्रक्रियेतील नोंदींबाबत गंभीर विसंगती असल्याचा आरोप केला आहे.


डॉ. गायकवाड यांच्या

म्हणण्यानुसार, ते मतदानासाठी केंद्रावर पोहोचले असता त्यांच्या नावासमोर आधीच मतदान झाल्याची नोंद आणि सही आढळली. मात्र, बॅलेट पेपरचे क्रमांक, मतदारांच्या सह्या आणि भाग क्रमांक यांच्यात तफावत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

यावेळी त्यांनी संबंधित नोंदींकडे निवडणूक अधिकाऱ्यांचे लक्ष वेधले. त्यांच्या दाव्यानुसार, अन्य दोन मतदारांच्या नोंदींमध्येही सह्या, भाग क्रम आणि बॅलेट पेपरच्या क्रमांकाबाबत विसंगती आढळली. गायकवाड यांच्या आक्षेपानंतर या दोन मतदारांशी संबंधित बॅलेट पेपर निवडणूक अधिकाऱ्यांनी रद्द केल्याचेही त्यांनी सांगितले.

या प्रकरणात अधिकाऱ्यांकडून दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही डॉ. गायकवाड यांनी केला. मात्र, आपण आपल्या भूमिकेवर ठाम राहून संबंधित नोंदींमधील विसंगती दाखवून दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर त्यांना नवीन बॅलेट पेपर देण्यात आला आणि त्यांनी मतदान केले

क्यूसीएफआयचे ३७ वे चॅप्टर कन्व्हेन्शन २५ ऑक्टोबरला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया (क्यूसीएफआय), नागपूर चॅप्टरच्या वतीने रामदेवबाबा विद्यापीठाच्या सहकायनि रविवार, २५ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता '३७ वे चॅप्टर कन्व्हेन्शन ऑन क्वालिटी कॉन्सेप्ट्स' आयोजित करण्यात आले आहे. रामदेवबाबा विद्यापीठात होणाऱ्या या संमेलनाची संकल्पना 'शाश्वत विकास आणि आत्मनिर्भरतेसाठी गुणवत्तापूर्ण नेतृत्व' अशी आहे. सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायणजी नुवाल यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी श्री रामदेवबाबा सार्वजनिक समितीचे महासचिव राजेंद्र पुरोहित, रामदेवबाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश पांडे, जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेड, कळमेश्वरचे प्लांट हेड अजय खंडेलवाल, क्यूसीएफआयचे अध्यक्ष अविनाश मिश्रा, संचालक अविनाश उपाध्याय आणि कार्यकारी संचालक डी. के. श्रीवास्तव उपस्थित राहणार आहेत. तसेच, क्यूसीएफआय नागपूर चॅप्टरचे अध्यक्ष एमेरिटस ए. के. जैन, अध्यक्ष विवेक श्रौती आणि सचिव विवेक जोशी यांचीही उपस्थिती राहणार आहे.

या वेळी संकल्प स्मरणिकेचे प्रकाशन आणि 'एक्सलन्स अकॅडमी'चे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येईल. संमेलनाच्या अनुषंगाने निबंध, कविता, घोषवाक्य आणि पोस्टर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमधील विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, मॉडेल सादरीकरणही होणार आहे. संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाला दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रो-चान्सलर डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. गुणवत्ता व्यवस्थापनाच्या संकल्पनांना प्रोत्साहन देणे, सातत्यपूर्ण सुधारणांना चालना देणे आणि शाश्वत विकासासाठी गुणवत्ता-केंद्रित कार्यसंस्कृती विकसित करणे, हा या संमेलनाचा उद्देश आहे. या संमेलनात गुणवत्ता क्षेत्रातील तज्ज्ञ, विद्यार्थी, विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि उद्योग क्षेत्रातील सदस्य सहभागी होणार आहेत.

मतदान शांततापूर्वक संपन्न, सावनेर शहरात ६० टक्के मतदान




दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्रातील दोन्ही तालुक्यातील सावनेर शहरात ४,कळमेश्वर ३,केळवद १,खापा १, खापरखेडा १,मोहपा १ असे एकुण ११ मतदान केन्द्रावर निवडणूक अधिकारी कल्याणकुमार डहाट यांच्या नेतृत्वाखाली चोख पोलीस बंदोबस्तात मतदान शांततेत सुरु आहे

सावनेर शहरातील चार बुथवर एकुण २०८५ मतदाते असे तालुक्यातील ३९५८ मतदाते तसेच कळमेश्वर शक्षर व तालुक्यातील १६४१ असे एकुण ६२५८ मतदाते त्यात ३५१२ पुरुष तर २७४५ महीला मतदात्यांचा सहभाग होता.त्यात सावनेर शहरातील चार बुथवर ७३२ पुरुष तर ५१० महिला मतदार असे एकुण १२४२ मतदात्यांनी मतदानाचा हक्क बजावला. तर काही मतदाते ४ वाजेनंतर मतदान केन्द्रावर पोहचल्याने त्यांना मतदानापासुन वंचीत रहावे लागले

शेवटचे वुत्त हाती आले तोवर ५९.५७ टक्के मतदान झाले असून निवडणुकीत सहभागी भाजप व काँग्रेस या प्रमुख पक्षाच्या कार्यकर्त्यांनी पोलींग बुथ लावले असुन दोन्ही बाजुने उत्साही वातावरणात गुलाल आमचाच च्या चर्चा रंगत आहे तर सावनेर कळमेश्वर विधानसभा क्षेत्राचे आमदार डॉ आशिषबाबू देशमुख यांनी सावनेर विधानसभा क्षेत्रातील सर्व मतदान केन्द्रावर भेटी देऊन मतदात्यांचे उत्साहवर्धन केले हे विशेष. तर सावनेर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी कल्याण कुमार डहाट, सावनेर तहसीलदार अक्षय पोयाम तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदान शांततेत पार पडले.

५१ व्या ग्रंथभेट योजनेतील ग्रंथांची यादी हरकतींसाठी खुली

३१ ऑक्टोबरपर्यंत सूचना, हरकती व आक्षेप नोंदविण्याचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ग्रंथालय संचालनालयाच्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान योजनेंतर्गत ५१ व्या ग्रंथभेट योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या ग्रंथांची यादी अवलोकनासाठी खुली करण्यात आली आहे. या यादीवर नागरिक, लेखक आणि संबंधित घटकांना ३१ ऑक्टोबरपर्यंत सूचना, हरकती व आक्षेप नोंदविता येणार आहेत. राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता आणि राज्य शासनाच्या संयुक्त निधीतून राबविण्यात येणाऱ्या या योजनेंतर्गत सन २०२४ मध्ये प्रकाशित होऊन ग्रंथालय संचालनालयास प्राप्त झालेल्या ग्रंथांमधून राज्य ग्रंथालय नियोजन समितीच्या उपसमिती सदस्यांनी ग्रंथांची निवड केली आहे. निवड झालेल्या ग्रंथांची यादी ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर १६ ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवड झालेल्या ग्रंथांमध्ये मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांतील ग्रंथांचा समावेश आहे. या ग्रंथयादीतील ग्रंथांचे वितरण ग्रंथालय संचालनालयाच्या नियमानुसार २५ टक्के ग्रंथसूटदराने करणे बंधनकारक आहे. यादीतील कोणत्याही ग्रंथाच्या नावाबाबत, लेखक, प्रकाशक किंवा किमतीबाबत काही त्रुटी अथवा बदल निदर्शनास आल्यास त्यासंदर्भातील सूचना, हरकती किंवा आक्षेप लेखी स्वरूपात नोंदविता येतील. वासाठी ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नगर भवन, मुंबई - ४०० ००१ या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत हस्तबटवड्याने किंवा पोस्टाद्वारे निवेदन पाठवावे. तसेच, संचालनालयाने नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावरही सूचना पाठविता येतील.

महाराष्ट्रातील २.५ लाख वंचित युवकांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराची संधी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्रातील नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, चंद्रपूर, नाशिक आणि सिंधुदुर्ग या सात जिल्ह्यांमधील २.५ लाखांहून अधिक वंचित युवकांपर्यंत पुढील पाच वर्षांत पोहोचून त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या प्रस्तावाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केले आहे.

मॅजिक बस इंडिया फाउंडेशनच्या या उपक्रमामध्ये जीवन कौशल्ये, रोजगारक्षमतेचे प्रशिक्षण, उद्योजकता विकास आणि रोजगाराशी जोडणी यांचा एकात्मिक समावेश आहे. महिलांचा श्रमशक्ती सहभाग वाढविणे, स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणे, ग्रामीण उद्योजकता वाढविणे तसेच पदवीधर युवकांमध्ये रोजगारासाठी आवश्यक कौशल्ये विकसित करणे या



शासनाच्या प्राधान्यक्रमांशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.या उपक्रमासाठी आवश्यक सहकार्य विभागामार्फत करण्यात येईल. तसेच निधीचे अभिसरण आणि औपचारिक सामंजस्य करार करण्यासाठीही आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.